जिल्हा व सत्र न्यायालय, सिंधुदूर्ग यांच्या आस्थापनेवरील अस्थायी पदे पुढे चालू ठेवण्यास मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
विधि व न्याय विभाग
शासन निर्णय क्रमांक : अस्थायी ०११८/१०६२/प्र.क्र.२०/कार्यासन ११
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १९ जानेवारी, २०१८.

<u>पहा</u> : १. शासन निर्णय वित्त विभाग क्र.असंक १००१/प्र.क्र.२९/२००१, वित्तीय सुधारणा, दि.१०/९/२००१
२. शासन निर्णय क्र.अस्थायी ०९१७/७९०/प्र.क्र.१९५/कार्यासन११, दि.०९/१०/२०१७.
३. शासन निर्णय वित्त विभाग क्र. पदनि-२०१६/प्र.क्र.०८/१६/आ.पु.क., दि.८/०१/२०१८.
४. जिल्हा व सत्र न्यायालय,सिंधुदूर्ग यांचे पत्र क्र. प्रशा/५१७० सन २०१७, दि.२८/११/२०१७.

शासन निर्णय :

जिल्हा व सत्र न्यायालय, सिंधुदूर्ग या आस्थापनेवरील ५८ अस्थायी पदांना संदर्भाकित क्र.२ च्या शासन निर्णयान्वये दि.१/१०/२०१७ ते ३१/१२/२०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

२. जिल्हा व सत्र न्यायालय, सिंधुदूर्ग यांनी संदर्भ क्र.४ रोजीच्या पत्रान्वये विनंती केल्यानुसार त्यांच्या आस्थापनेवरील पुढील तक्त्यात नमूद ५८ अस्थायी पदांना या शासन निर्णयान्वये त्यापुढील म्हणजेच दि.१/०१/२०१८ ते २८/०२/२०१८ पर्यंतच्या कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात येत आहे.

अ.क्र.	पदनाम	अस्थायी पदांची संख्या
१	अधीक्षक	०१
२	सहायक अधीक्षक	०४
३	वरिष्ठ लिपीक	०७
४	कनिष्ठ लिपीक	२३
५	प्रमुख बेलिफ	०२
६	चपराशी	०८
७	मराठी लघुलेखक (नि.श्रेणी)	०१
८	मराठी व इंग्रजी लघुलेखक (निम्न श्रेणी)	०१
९	बेलिफ	०७
१०	पहारेकरी	०२
११	लघुलेखक (नि.श्रेणी)	०१
१२	सफाई कामगार	०१
	एकूण पदे	५८

३. यासाठी होणारा खर्च जिल्हा व सत्र न्यायालय, सिंधुदूर्ग या कार्यालयासाठी मागणी क्र.जे-१, २०१४, न्यायदान, (०२) जिल्हा व सत्र न्यायाधीश, (०२)(०१) जिल्हा व सत्र न्यायाधीश (अनिवार्य) (२०१४ ०१७२) ०१, वेतन या लेखाशीर्षाखाली सन २०१७-२०१८ या वित्तीय वर्षात मंजूर झालेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

४. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या शासन निर्णय क्रमांक पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६ आपुक, दि.०८/०१/२०१८ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान केलेल्या अधिकारान्वये निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०११९१६२१५४६५१२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

Anita Dipak Ripote

Digitally signed by Anita Dipak Ripote
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Law And Judiciary Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=28bdb8b03e204307a26238ccccb76a2c1eaa9ed4838f450b88dfb9ca9793b4b5, serialNumber=25e18795e96deb90b1428c41cb6c87bc90c3bb1f0ea059da3e0a07a3bc00c6c8, cn=Anita Dipak Ripote
Date: 2018.01.19 16:27:32 +05'30'

(अनिता रिपोटे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) महाप्रबंधक, उच्च न्यायालय, मुंबई
२) प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जिल्हा व सत्र न्यायालय, सिंधुदूर्ग.
३) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१, मुंबई,
४) महालेखापाल (लेखापरीक्षा) महाराष्ट्र-१, मुंबई.
५) जिल्हा कोषागार अधिकारी, सिंधुदूर्ग.
६) वित्त विभाग, व्यय ५/आ.पु.क.कक्ष/अर्थसंकल्प११,मंत्रालय, मुंबई.
७) विधि व न्याय विभाग, कार्या.२०/कार्या.२३, मंत्रालय, मुंबई.
८) निवडनस्ती (कार्यासन ११).

****